IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

भारतीय जलनीतीचे उद्गाते – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

अमृता रामसेवक मुखेकर
संशोधक विद्यार्थी- राज्यशास्त्र,
हिंद सेवा मंडळाचे, पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर

Article Info

Article History:
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

Keywords:
पाणी,
मानवी विकास

ABSTRACT

मानवी जीवनाचा मुख्य स्त्रोत पाणी आहे. आज 2025 मध्येही पाणी विषयावरील गुंतागुंत कायम आहे. खरेतर पाणी केवळ उपजीविकेचे साधन नाही तर मानवाच्या विकासाचे उगमस्थान आहे. पण हेच पाणी कायमच सत्तासंबंधाचे, संघर्षाचे व विषमतेचे कारण बनताना दिसत आहे. पाण्याचे हक्क हे पूर्वीपासूनच विशिष्ट समुहांकडे एकवटलेले बघावयास मिळतात. भारतात जातीसंरचनेच्या उतरंडीत उच्च जातींनी पाण्याचे हक्क स्वत:च्या ताब्यात घेतले होते. त्यामुळे या पाण्याच्या समन्यायी वाटपासाठी अविरत प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आणि त्याचा अभ्यास होणे ही काळाची गरज आहे.

Plagiarism Check Report:
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

How to Cite: Mukhekar, A. R. (2025). **भारतीय जलनीतीचे उद्गाते – डॉ. बाबासाहेब आंबेडकर.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 805–809.

प्रस्तावना :

मानवी जीवनाचा मुख्य स्त्रोत पाणी आहे. आज 2025 मध्येही पाणी विषयावरील गुंतागुंत कायम आहे. खरेतर पाणी केवळ उपजीविकेचे साधन नाही तर मानवाच्या विकासाचे उगमस्थान आहे. पण हेच पाणी कायमच सत्तासंबंधाचे, संघर्षाचे व विषमतेचे कारण बनताना दिसत आहे. पाण्याचे हक्क हे पूर्वीपासूनच विशिष्ट समुहांकडे एकवटलेले बघावयास मिळतात. भारतात जातीसंरचनेच्या उतरंडीत उच्च जातींनी पाण्याचे हक्क स्वत:च्या ताब्यात घेतले होते. त्यामुळे या पाण्याच्या समन्यायी वाटपासाठी अविरत प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आणि त्याचा अभ्यास होणे ही काळाची गरज आहे.

संशोधनाचे उद्देश :

आज पाण्याचा प्रश्न गुंतागुंतीचा बनला आहे. नदी पाणी वापर, वाटपाचे प्रश्न वरचेवर उद्भवत आहेत. या प्रश्नात राज्य सरकारांपेक्षा केंद्र सरकारच प्रभावीपणे योजना राबवू शकते. त्यामुळे पाणी हा विषय केंद्रसूचित समाविष्ट करण्याची दूरदृष्टीची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा देशाच्या पाणीविषयक इतका दूरगामी व सर्वकष विचार सामान्यपर्यन्त पोहोचविणे हा या संशोधनाचा उद्देश आहे.

गृहीतक :

देशाच्या शेती आणि उद्योग या महत्वाच्या आर्थिक क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या असणाऱ्या सिचनासारख्या पायाभूत क्षेत्राच्या विकासाचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यावहारीक धोरणामुळे घातला आहे. देशाच्या पाणी प्रश्नांचा दूरगामी सर्वकष विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरुवातीपासून केला.

संशोधन पद्धती :

संशोधनाकरिता प्राथमिक आणि दुय्यम संशोधन साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनांमध्ये शासकिय कार्यालयांना भेटी देऊन तेथून बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश कालखंडात श्रम, सार्वजनिक बांधकाम, सिंचन व ऊर्जा या खात्याचे मंत्री असताना घेतलेल्या निर्णयाची शासकिय कागदपत्रांच्या माध्यमातून माहिती घेतली. दुय्यम संशोधन साधनांमध्ये ग्रंथ, नियतकालिके वृत्तपत्रे यांचा समावेश होतो.

मुख्य विषय :

महाकाय सामाजिक विकालांगतेच्या विरोधात मोठ्या धाडसाने आणि चिकाटीने उभ्या ठाकणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या एका अस्पृश्याने एक प्रसिद्ध संविधानवादी, प्रतिष्ठीत संविधानपटू, विद्वान व कायदेपंडित तसेच समाजातील सर्वाधिक दबलेल्या, दडपलेल्या वर्गाचे, बहीष्कृतांचे सर्वमान्य नेते बनणे ही गोष्ट केवळ अद्वीतियच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा पाया मूलत: आर्थिक परिवर्तनावर तयार झाला होता. सामाजिक परिवर्तनासाठी आर्थिक परिवर्तन आवश्यक असल्याने त्याबाबत अनेक सिद्धांत देशासमोर मांडून त्यांनी त्यांची अंमलबजावणी केली. आर्थिक परिवर्तनात पाणी महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील शेती व शेतकरी यांचे संशोधन करून 1918 मध्ये लहान शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाय (Small Holdings In India And Their Remedies) या शिषर्काचा शोधनिबंध जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक सोसाटीयच्या अंकात लिहिला. डॉ. आंबेडकरांच्या मते, मानवी अस्तीत्वासाठी जमीन आणि पाणी हे घटक अतिशय महत्त्वाचे आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. पाण्याशिवाय, उत्पादकता वाढणे व शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही, हे त्यांनी ब्रिटिश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे; शेतकरी समृद्ध झाला तरच शेतीशी निगडीत सर्व घटकांना या आर्थिक सक्षमतेचा कायदा होईल असे मत त्यांनी मांडले.

पाण्याच्या प्रश्नावरून जातीय आणि धार्मिक अस्मिता कशा उफाळून येतात याची उदाहरणे आपण आजही

पाहतो. तथाकथित उच्चवर्णीय, उच्चजातीय लोकांकडून केला जाणारा व्देष, दुजाभाव आजही पहावयास मिळतो. सार्वजनिक पाणवठ्यावर अस्पृश्यांना पाण्याचा मूलभूत हक्क मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली 20 मार्च 1927 रोजी चवदार तळे सत्याग्रह महाड येथे केला. **चवदार तळ्याचा सत्यग्रह होत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांना उद्देशून म्हटले होते, " चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने तुम्ही आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही. आजपोवतो चवदार तळ्याचे पाणी प्यायलो नव्हतो तरी तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ पाणी पिण्याकरिता नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळ्यावर आपल्याला जावायाचे आहे**."

राज्यघटना तयार करताना पाणी हा विषय केंद्रशासनाच्या अंतर्गत ठेवावा किंवा करंट लिस्टमध्ये तरी घ्यावा अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. संसदेमध्ये त्यांनी याविषयावर अनेकदा स्पष्टपणे आपली मते मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, " जमीन आणि पाणी ही विकासाची संसाधने असली तरीही दोहोंचे गुणधर्म, वैशिष्टये आणि स्वरूप निरनिराळे आहे. त्यामुळे या दोन्ही घटकांना एकत्रित न्याय असे निकष लावता येणार नाहीत. जमीन स्थिर आहे ती कुठेही हलणार नाही. नैसर्गिक वा मानवी हस्तक्षेपाशिवाय तित काहीही बदल होऊ शकत नाही. तसे पाण्याचे नाही. पाणी प्रवाही आहे. ते एका जागी राहत नाही. ते चल असल्यामुळे उतार ज्या दिशेने मिळेल त्या बाजूला ते वाहून जाणार आहे. त्यामुळे जमीन हा विषय जरी राज्यसरकारांच्या अखत्यारित ठेवलेला असला तरी पाणी हा विषय मात्र राज्य सरकारांच्या अखत्यारीत ठेवता कामा नये; कारण देशातल्या बऱ्याच नद्या ह्या आंतरराष्ट्रीय (उदा. गंगा, ब्रम्हपुत्रा, सिंधु इत्यादी) आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या नद्यांच्या पाणीवाटप भूमिकेला आणि विचारांना तेव्हा कोणीही फारशी साथ दिली नाही. परिणामी पाणी विषयाचा समावेश राज्यघटनेतील राज्यसूचीमध्ये करण्यात आला. परिणामी आजही पाणी विषयावरील गुंतागुंत कृष्णा नदी पाणी वाटप, गोदावरी नदी पाणी वाटप इ. वादावरुन कायम असल्याचे दिसून येते.

1942 ते 1946 या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य असताना त्यांच्याकडे श्रम, सार्वजनिक बांधकाम, सिंचन व ऊर्जा ही खाती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाण्याचे नियोजन, विद्युत ऊर्जा, धरणे, आणि आर्थिक नियोजन उत्तम केले जे आजही दुर्लक्षित आहे. 20 जुलै 1942 रोजी मंत्रीपदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर पाणी आणि वीज यासंबंधी देशात सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन, इरिगेशन ऑडव्हायजर व इलेक्ट्रीकल कमिशनर असे तीन प्रशासकीय विभाग अस्तित्वात होते; ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खटकली. कारण या विभागांची रचना देशाच्या वाढत्या लोकसंख्या व त्यांच्या गरजांच्या पूर्णतेसाठी आपुऱ्या होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मर्यादित अधिकार असलेल्या तीन प्रशासकीय विभागांच्या रचनेत आमूलाग्र बदल केले. सेंट्रल वॉटरवेज, इरिगेशन एण्ड नॅव्हिगेशन कमिशन व सेंट्रल टेक्निकल पॉवर बोर्ड या नव्या व्यवस्था निर्माण केल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जलक्षेत्राच्या विकासासाठी तीन सुत्रांवर आधारित जलनीती तयार केली. ती सुत्रे पुढीलप्रमाणे-

01) जलसंपत्ती विकासासाठी नदीखोरे क्षेत्र हा आधार धरून सिंचन प्रकल्पांचे/ योजनांचे नियोजन करताना बहुउद्देशिय द्रुशतिकोण ठेवणे आवश्यक आहे. शेती, सिंचन, पिण्यासाठी पाणी, औदयोगिक विकास योजनांसाठी, जलवाहतुक, वीजनिर्मिती अशी उद्दिष्टे असावीत.

02) जलप्रकल्पांची उभारणी करण्यासाठी नदीखोरे प्राधिकरण ही प्रशासकीय व्यवस्था असावी.

03) जलसंपत्ती आणि ऊर्जा क्षेत्राच्या नियोजित विकास योजनांच्या यशस्वी अमंलबजावणीसाठी केंद्रस्तरावर कुशल तंत्रज्ञाच्या गटाची निर्मिती करावी. उदा. सेंटर वॉटरवेज इरिगेशन अँड नॅव्हिगेशन कमिशन, केंद्रीय तांत्रिक वीज मंडळ.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जलनीतीचा स्वीकार सर्व संबंधितांकडून करण्यात आला. या नीतीचा

फायदा देशातील नदीखोरे प्राधिकरणाच्या माध्यमातून बहुद्देशिय प्रकल्पांच्या नियोजनाचा पाया रचला गेला. त्यातूनच दामोदर नदी खोरे योजना, सोन नदी खोरे योजना, महानदी खोरे योजना व कोसी नदी खोरे आणि इतर नद्यांचे खोरे विकास योजना पूर्णत्वास गेल्या. या सर्व योजना पुर नियंत्रण, सिंचन, जलवाहतुक, पिण्याच्या पाणी योजना, जलविद्युत आणि इतर गरजांसाठी राबवण्यात आल्या. हिराक्रूड धरण 1957 मध्ये पूर्ण झाले आणि ओरिसा राज्य वैभवसंपन्न व सशक्त झाले याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदर्शी नेतृत्वाला आहे. 1943 मधील दामोदर नदीला आलेल्या महापूराने कोलकाता शहराशी देशाचा रस्ते व रेल्वे या दोन्हींचा संपर्क तुटला आणि हिच गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर राष्ट्रीय आपत्ती म्हणून कथन केली गेली. बंगाल सरकारने या विनाशकारी पुराबाबत चौकशी समितीची नेमणूक केली. या समितीने केलेल्या शिफारशीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ पुरनियंत्रणासाठी उपखोऱ्यातील लहान नद्यांवर धरणे बांधून पाणी अडविण्यासोबतच त्या भागातील जंगल आणि मातीचे संवर्धन करण्याच्या विविध योजना सुचविल्या. महत्वाकांक्षी व बहूउद्देशिय मोठ्या प्रकल्पांची रचना करण्यासाठी अमेरिकेतील टेनेसी व्हॅली योजनेचा संपूर्ण स्वत: केला. धरणाच्या संकल्पना, धरणाचे प्रकार स्वत: अभ्यासले.

सोन नदी खोरे प्रकल्प बहुद्देशीय प्रकल्प डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाला. या प्रकल्पाव्दारे उत्तरप्रदेशातील औदयोगिक विकास, सामाजिक स्थिरता, जंगलांची पुर्ननिर्मिती स्थलांतरीतांचे पुनर्वसन, रस्ते आणि शाळा, अतिरिक्त सिंचन सुविधांची व्यवस्था, सहकार क्षेत्राचा विकास, खते व शेती प्रात्याक्षिक योजनांची निर्मिती, प्रांतिक आणि नगर विकास योजना मंडळांची निर्मिती केली. नदी खोरे विकास योजनां अंतर्गत नदीच्या लाभ क्षेत्रात सहकार क्षेत्राला चालना देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देश स्वतंत्र होण्यापूर्वी केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 03 जानेवारी 1944 रोजी झालेल्या कलकत्ता येथील परिषदेत आपले विचार पुढीलप्रमाणे मांडले-

01) नदी व इतर जलमार्गातील नौकानयन सुधारण्यासाठी उपाययोजना करणे.
02) सिंचन कालव्यांचा वापर शक्य तेथे अंतर्गत जलवाहतुकीसाठी करणे.
03) नवीन कृतिम जलमार्गांची निर्मिती करणे.
04) आगबोट, हाताने वल्हवण्याच्या नौका आणि शक्तीसाधनांवर चालणाऱ्या मोठ्या जहाजाचा वापर वाढविणे.
05) देशातील गलबतांचा विकास करणे. ही माहिती डिसेंबर 1944 रोजी सर्व प्रांतांना पाठविलेल्या पत्रात स्पष्ट केलेली होती. **त्यानुसार आंतरराज्यीय नद्यांच्या समस्या लक्षात घेता खालील बाबींचा समावेश प्राधिकरणात करण्यात आला**.

01) आंतरराज्यीय नदी आणि तिच्या उपनद्यातील पाण्याचे अधिकार प्राप्त राज्याने प्राधिकरणाला देणे.
02) प्राधिकरणात येत असलेल्या क्षेत्रात प्राधिकरणाला विद्युत निर्मितीसाठी आवश्यक सर्व अधिकार प्रांत आणि राज्य यांना देण्यासाठी सहमती देणे.
03) प्राधीकरणाच्या मान्यतेशिवाय कोणतेही प्रांत आणि राज्य नदीतील पाणी कोणत्याही परिस्थितीत काढून घेणार नाही अथवा वापरणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चिंतनातून या देशातील केवळ दलितांच्या प्रश्नांची सोडवणूक झाली असे नाही तर देशातील सर्वांगीण विकासात पायाभूत गोष्टींवर भर देऊन दीर्घकालीन विकास योजना पूर्ण करून सामाजिक समतोल राखण्याचे काम त्यांनी केले आहे आणि ते अभ्यासणे ही काळाची गरज आहे.

निष्कर्ष :

समपातळीत राहणे हा पाण्याचा गुणधर्म आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाण्याच्या या गुणधर्माचा स्वत: च्या विचारांत अवलंब करत समस्त समाजव्यवस्था विकास योजनांच्या माध्यमातून समपातळीवर ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जलविषयक दीर्घकालीन धोरणांतून देशाच्या दिनदुबळ्या लोकांचा आर्थिक विकास साध्य झाला. नदी खोरे विकास क्षेत्रात सहकार चळवळीला चालना प्राप्त झाली.

संदर्भ:

01) मून वसंत व हरी नरके (संपा.) 2002- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड 18 वा, भाग 5, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई.
02) थोरात सुखदेव, डॉ. बाबसाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, सुगावा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती 2005.
03) गुंजकर सोमनाथ व कापसे शिवसांब(संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन व दृष्टिकोण, अनुराधा प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती 2017.
04) हनवते प्रकाशन व डॉ. हनवते उत्तम (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर काल, आज आणि उद्या, निसर्ग प्रकाशन, हिंगोली . 11 जुलै 2016.